**Maharashtra Political Science and Public Administration Conference**

Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

Volume - 10 No - 1 Issue - 28 Jan-April 2022 ISSN- 2347-9639

39Years

# VICHAR MANTHAN

National Research Journal of Political Science and Public Administration

(Peer Reviewed Journal)

IIJIF
Impact Factor
2.283



भारतीय स्वातंत्र्याचा
अमृत महोत्सव

महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका

# विचार मंथन

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे

संपादक
प्राचार्य डॉ. प्रमोद पवार
प्राचार्य डॉ. मनोहर पाटील । प्राचार्य डॉ. बाळ कांबळे । डॉ. रविंद्र भणगे । डॉ. विठ्ठल दहिफळे

अथर्व

महाराष्ट्र राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन परिषद

Reg. No. MAH/12-83/Aurangabad-F-985

# VICHAR MANTHAN

# विचारमंथन

**National Research Journal of Political Science and Public Administration**
**(A Peer Reviewed Journal)**
Vol. - 10, No - 1 Issue - 28 Jan.-April 2022 ISSN- 2347-9639

**♦ Editor ♦**

**Prin. Dr. Pramod Pawar**

**Prin. Dr. Manohar Patil** **Prin. Dr. Bal Kamble**

**Prof. Dr. Ravindra Bhanage** **Dr. Vitthal Dahiphale**

**Dr. Sandip Nerkar**

**♦ President ♦**

**rin. Dr. Pramod Pawar**
: pramodpawar1761@gmail.com
Mob : **9423582073**

**♦ Secretary ♦**

**Prin. Dr. Manohar Patil**
**Email :** manoharpatil123@gmail.com
Mob : **9422287053**

**♦ Guided by ♦**

**Prin. Dr. P. D. Deore**
11, Shri Samarth Appartment, Chitrangan Soc.,
Savarkar Nagar, Gangapur Road, **Nashik-13**
Mob : **9423980457**

**Maharashtra Political Science and Public Administration Conference**
Reg. No. MAH/12-83/Aurangabad-F-985
**Visit Us : vicharmanthanjournal.org**
**E-mail : vicharmanthanjournal@gmail.com**

10 Year's
Maharashtra Political Science & Public Administration Conference's

# VICHAR MANTHAN

National Research Journal of Political Science and Public Administration
(A Peer Reviewed Journal)

## Peer Reviewed Committee

**Prin. Dr. Pramod Pawar** (Amalner)
**Email :** pramodpawar1761@gmail.com

**Prof. Dr. Ravindra Bhanage** (Kolhapur)
**Email :** ravindrabhanage@gmail.com

**Prin. Dr. Manohar Patil** (Dhule)
**Email :** manoharpatil13@gmail.com

**Prin. Dr. Bal Kamble** (Karjat - Pune)
**Email :** bal.kamble@yahoo.in

**Dr. Vitthal Dahiphale** (Nanded)
**Email :** vitthaldahiphale8@gmail.com

**Dr. Sambhaji Patil** (Bhadgaon)
**Email :** sspatil2011@gmail.com

**Dr. Sanjay Wagh** (Kalyan)
**Email :** sswagh2009@gmail.com

**Dr. Sandip Nerkar** (Amalner)
**Email :** [illegible]@gmail.com

**Dr. Vigar Shaikh** (Jalgaon)
**Email :** skvigar@rediffmail.com

**Dr. Gautam Bhalerao** (Jalgaon)
**Email :** gb5576@gmail.com

## Guided by

**Prin. Dr. P. D. Deore**
11, Shri Samarth Appartment, Chitrangan Soc.,
Savarkar Nagar, Gangapur Road, Nashik-13
Mob : 9423980487

## Managing Editor

**Mr. Yuvraj Mali** (Jalgaon)

♦ Publishers ♦
**Atharva Publications**
**Head Office :**
Shop No. 2, 'Nakshtra' Apartment, Housing Society, Shahunagar, Jalgaon - 425001. Ph.No. 0257-2239666
◦ **Branches** ◦
**New Delhi** - 213, Vardan House, 7/28, Ansari Road, Daryaganj, New Delhi - 110002. **Mob.** [illegible]
**Mumbai** - Ashirwad Building, 1007, 10th floor, N.M. Nagar, Behind Tardeo Police Station, Tardeo, Mumbai - 400034. **Mob.** [illegible]
**Pune** - Dhayri, Benkar Nagar, Pune - 411041. **Mob.** [illegible]

'विचारमंथन' या संशोधनपत्रिकेत प्रसिद्ध झालेली मते संपादक, सहसंपादक, कार्यकारी संपादक आणि सल्लागार मंडळ यांची असतीलच असे नाही. या संशोधनपत्रिकेत प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखांतील लेखकांची मते ही त्यांची वैयक्तिक मते असून, त्यांच्या संशोधनविषयाची जबाबदारी त्या त्या लेखकांवर राहील.

मेसर्स अथर्व पब्लिकेशन्सच्या वतीने कार्यकारी संपादक श्री. युवराज भटू माळी यांनी शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, हाऊसिंग सोसायटी, [illegible], तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले व [illegible] प्रिंटर्स, [illegible], जळगाव येथे मुद्रित केले. मोबाइल : [illegible], फोन : ०२५७-२२३९६६६.

# * अनुक्रमणिका *


- **नायकप्रधान लोकानुरंजनवादी राजकारण आणि भारतीय लोकतंत्र** ........ ०१
  प्रा. डॉ. विठ्ठल दहिफळे
- **महाराष्ट्राच्या राजकारणातील बदलते प्रवाह : आघाड्यांचे राजकारण** ........ १५
  प्रा. डॉ. माधव केरबा वाघमारे
- **महाराष्ट्रातील आघाड्यांचे राजकारण** ........ २०
  डॉ. श्याम पुंजाराम पवार
- **विदर्भाची मागासलेपण सद्य:स्थिती** ........ २३
  धनराज लक्ष्मण शिरभैय्ये, डॉ. जीवन एच. पवार
- **लोकशाही : एक जीवनपद्धत संकल्पना** ........ २७
  डॉ. संभाजी संतोष पाटील
- **प्रादेशिक असमतोलाचे राजकारण व मानव विकास** ........ ३५
  डॉ. हनुमंत भूमकर, रावसाहेब रतन चव्हाण
- **महाराष्ट्र राज्याची सहा दशकांची वाटचाल आघाडीचे राजकारण** (Coalition Politics) ........ ३९
  प्रा. प्रमोद निवृत्ती कपले
- **महाराष्ट्रातील आघाडीचे राजकारण** ........ ४५
  प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे
- **भारतीय राज्यघटनेच्या अंमलबजावणीची चिकित्सा** ........ ४९
  डॉ. व्ही. एल. एरंडे
- **भारतीय लोकशाहीतील वृत्तपत्रांची भूमिका** ........ ६५
  प्रा. डॉ. एल. यू. मेश्राम, प्रा. श्रीमती स्मिता भामरे
- **प्रादेशिक असमतोल** (Regional Imbalance) ........ ७०
  डॉ. सौ. ऊर्मिला महेश चव्हाण
- **विदर्भाची मागासलेपण सद्य:स्थिती** ........ ७४
  माधव चोले
- **Role of India in World Politics Today** ........ ८०
  Dr. R. G. Suralkar
- **A View on Indian Democracy** ........ ८३
  Dr. Nirmal Ekanath Sitaram
- **India's Foreign Policy & SAARC** ........ ८७
  Dr. R. K. Kale
- **Political Impact and Socio-Economical Developmental Disparities in Divisions of Maharashtra** ........ ९३
  C. A. Khillare, R. B. Khandare , R. V. Maske

# महाराष्ट्रातील आघाडीचे राजकारण

**प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे**
संत भ. बा. कला महाविद्यालय,
सिंदखेड राजा

आज संपूर्ण जगाच्या राजकारणाला कोणत्या प्रश्नाने ग्रासले असेल, तर ते म्हणजे Coalition. कोणत्याही देशाच्या राजकारणाचा अभ्यास करताना हा प्रश्न जाणवत आहे. कारण कोणतेही असो; पण समस्या मात्र सर्वांसमोर सारखीच आहे. त्यामुळे या Coalition चे फायदे आहेत, तसेच नुकसान आहे. वाढती बहुपक्ष पद्धती व राजकीय पक्षाला असलेला सत्तेचा हव्यास, हे कारण मुख्य असलेले आपल्या लक्षात येते. त्यामुळे आज राजकीय व्यवस्था स्थिर असलेली दिसत नाही. त्याच समस्येतून भारतसुद्धा सुटलेला नाही. भारताच्या राजकारणावर आघाडीच्या राजकारणाचा फार मोठा परिणाम झालेला अभ्यासातून लक्षात येतो.

आघाडी सरकार म्हणजे नेमके काय? तर दोन किंवा त्यापेक्षा अधिक राजकीय पक्षांनी एकत्र येऊन स्थापन केलेले कार्यकारी मंडळ होय. लोकशाही व्यवस्था असलेल्या राष्ट्रांतील सार्वत्रिक निवडणुकीनंतर कायदेमंडळाच्या कनिष्ठ सभागृहात जेव्हा कोणत्याही एका राजकीय पक्षाला स्वबळावर सरकार स्थापन करण्याइतपत स्पष्ट बहुमत प्राप्त होत नाही, तेव्हा अशा राजकीय पेचप्रसंगातून मार्ग काढण्यासाठी काही राजकीय पक्षांनी समझोत्याच्या आधारावर केलेली पर्यायी व्यवस्था म्हणजे आघाडी सरकार.

विशेषत्वाने संसदीय लोकशाही शासनपद्धती आणि बहुपक्ष पद्धती असलेल्या देशांमध्ये बऱ्याच वेळा अशी परिस्थिती निर्माण होते, अशा वेळी व्यापक राष्ट्रीय हितासाठी काही राजकीय पक्ष आपले मतभेद बाजूला ठेवून किमान समान राजकीय कार्यक्रमाच्या आधारावर एकत्र येऊन आघाडी सरकार स्थापन करतात. आघाडी सरकार प्रयोग हा युरोपीय देशातील एक सामान्य बाब असून, जगभरात भारत, श्रीलंका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड अशा देशांतही आघाडी सरकारे हा तेथील राजकीय जीवन व संस्कृतीचा एक भाग बनला आहे. 'आघाडी' या मराठी शब्दाला 'Coalition' हा पर्यायी इंग्रजी शब्द आहे; ज्याची व्युत्पत्ती लॅटिन भाषेतील Coalitio या शब्दापासून झाली आहे. ज्याचा अर्थ एकत्र किंवा संयुक्त असा होतो. विशिष्ट हेतूच्या पूर्ततेसाठी केलेली संयुक्त कृती म्हणजे Coalition होय.

भारताच्या संदर्भात विचार करावयाचा झाल्यास, भारतात १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर नऊ राज्यांत स्थापन झालेली काँग्रेसेत्तर सरकारे हे बहुतांशी आघाडी सरकारे होती. १९६७ च्या आघाडी सरकारच्या स्थापनेनंतर १० वर्षांनी १९७७ मध्ये पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वात जनता सरकारच्या रूपाने केंद्रात प्रथम आघाडी सरकार स्थापन झाले. मोरारजी देसाई सरकार हे एकाच पक्षाचे सरकार असले, तरीही भारतातील विविध राजकीय पक्षांनी एकत्र येऊन जनता पक्ष स्थापन केला होता. पुढे १२ वर्षांनंतर हा जनता परिवार जनता दल या रूपाने नव्याने संघटित झाला व १९८९ मध्ये केंद्रात व्ही. पी. सिंग यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय मोर्चा आघाडी सरकार स्थापन झाले. ९० च्या दशकात झालेल्या काँग्रेस वर्चस्वाचा ऱ्हास, विविध प्रादेशिक पक्षांचा उदय आणि समाजातील तळागाळाच्या घटकांतील वाढत्या राजकीय जाणिवा यांचा एकत्रित परिणाम म्हणून आघाडीधर्म हाच भारतीय राजकारणाचा मूलाधार बनला.

**आघाडी सरकारचे प्रकार –**

सर्वच आघाडी सरकारे सारखी नसतात. त्याच्या निर्मितीप्रक्रियेतील काही घटकांमुळे आघाडी सरकारची वेगवेगळे प्रकार दिसतात –

दोन किंवा त्यापेक्षा अधिक पक्ष आघाडी करून एकत्रितपणे निवडणुका लढवितात व बहुमत प्राप्त करून सरकार स्थापन करतात, त्यास निवडणूकपूर्व आघाडी म्हणतात.

निवडणुकीमध्ये कोणत्याही पक्षाला बहुमत न मिळाल्यामुळे निवडणुकीच्या निकालानंतर जेव्हा काही पक्ष

आघाडी करतात, त्यास निवडणुकोत्तर आघाडी म्हणतात.

विशिष्ट राजकीय पक्षाच्या विरोधातील आघाडी.

राष्ट्रीय सरकार.

अल्पमतातील राजकीय पक्षाच्या सरकारला बाहेरून पाठिंबा देणे.

**महाराष्ट्रातील आघाडी सरकारचा प्रवास –**

१९६७ पूर्वी भारतातील व राज्यातील काँग्रेस वर्चस्व प्रबळ होते आणि या नेतृत्वाशी सल्लामसलत करून निर्णय घेण्याची केंद्रीय नेतृत्वाची कार्यपद्धती होती. त्यामुळे तळातील स्तरापासून काम करणाऱ्या सक्षम व कार्यक्षम अनुयायांना वरची पदे व सत्तेतील स्थाने मिळण्याची संधी होती. पक्षात 'हायकमांड' नावाचा प्रकार नव्हता. मात्र, १९६९ मध्ये काँग्रेस पक्षाचे विभाजन झाले. इंदिरा काँग्रेस व रेड्डी काँग्रेस (मूळ काँग्रेस) होते. त्यामुळे भारतातील इतर राज्यांत काँग्रेसचे वर्चस्व कमी झाले, तरी महाराष्ट्रातील तत्कालीन नेत्यानी महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष टिकवून ठेवण्याचे काम केले.

केंद्रात १९७७ मध्ये जनता पक्षाचे सरकार सत्तारूढ होते. महाराष्ट्रातून काँग्रेसला २० जागा मिळाल्या होत्या. १९७७ च्या आणीबाणीचा हा परिणाम काँग्रेस पक्षावर झाल्याचा दिसून येतो; परंतु १९७७ च्या पराभवानंतर शंकरराव चव्हाणांच्या जागी काँग्रेसने वसंतदादा पाटील यांची १७ एप्रिल १९७७ रोजी मुख्यमंत्रिपदी नियुक्ती केली. १९७८ मध्ये इंदिरा गांधींचे नेतृत्व स्वीकारण्यावरून काँग्रेस पक्ष विभागला. परिणामी महाराष्ट्रातही काँग्रेसअंतर्गत विभाजन झाले. त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर परिणाम झाला. त्यातच १९७८ मध्ये विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. त्यात कोणत्याच पक्षाला बहुमत मिळाले नाही.

जनता पक्षाला सरकार बनविण्यापासून थांबविण्यासाठी वसंतदादा पाटील यांनी राजकीय डावपेच आखण्यास सुरुवात केली. केंद्रातील नेत्यांना त्यांनी दोन्ही काँग्रेसचे आघाडी सरकार बनविणे किती आवश्यक आहे, हे पटवून दिले, तसेच महाराष्ट्रातील काँग्रेसची प्रतिमा चांगली राहावी यासाठी या सहमतीच्या राजकारणाला संमती दिली व महाराष्ट्रात पहिले आघाडी सरकार स्थापन झाले. अशाप्रकारे महाराष्ट्रात समविचारी पक्षांचे; पण दोन काँग्रेसचे आघाडी सरकार स्थापन झाले व महाराष्ट्रात आघाडीच्या राजकारणाचा प्रारंभ झाला; परंतु काही कारणास्तव मुख्यमंत्री व आघाडीचे नेते वसंतदादा पाटील, उपमुख्यमंत्री नाशिकराव तिरपुडे व शरद पवार यांच्यात घुसमट चालू होती. दोन्ही नेत्यांमधील मतभेद वाढतच गेले. परिणामी साडेचार महिने आघाडीचे सरकार सत्तेत टिकले. शरद पवारांनी ३०-४० आमदारांना सोबत घेऊन सत्तेतून बाहेर पडायचे व जनता पक्षाला पाठिंबा द्यायचा व केंद्रात महाराष्ट्रातील सरकार अल्पमतात गेले, हे कारण समोर करून सरकार पाडायचे, असे ठरले. विधिमंडळाची बैठक सुरू होताच शरद पवार ४० आमदारांसह विरोधी पक्षाच्या बाकावर जाऊन बसले व महाराष्ट्रातील पहिले आघाडी सरकार अल्पमतात येऊन संपुष्टात आले.

जुलै १९७८ मध्ये महाराष्ट्रात सत्तांतर घडून आले. शेतकरी कामगार पक्ष, जनता पक्ष, कम्युनिस्ट पक्ष व समाजवादी काँग्रेस या आघाडीच्या रूपाने शरद पवार यांच्या नेतृत्वात दुसरे पुलोद आघाडी सरकार सत्तारूढ झाले. महाराष्ट्रात प्रथमच बिगर-काँग्रेसी सरकार सत्तेवर आले. काँग्रेस पक्षाला महाराष्ट्रात राजकीय आव्हान मिळाले. केंद्रात १९७९ मध्ये जनता पक्षात फूट पडली. महाराष्ट्रात ९९ पैकी ३० आमदार जनसंघ पक्षातून बाहेर गेले. पुढे १९८० च्या लोकसभेच्या निवडणुकीत इंदिरा गांधी पुन्हा निवडून आल्या व त्यांनी बिगर-काँग्रेसी सर्व राज्य सरकारे बरखास्त केली. याच वेळी वसंतदादा पाटील यांनी महाराष्ट्रातील पुलोद सरकार अल्पमतात आहे, हे कारण दाखवून इंदिरा गांधींची भेट घेतली. पंतप्रधानांच्या शिफारशीवरून राष्ट्रपतींनी महाराष्ट्राची विधानसभा १७ फेब्रुवारी १९८० रोजी बरखास्त केली व महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू केली व दुसरे आघाडी सरकार संपुष्टात आले.

महाराष्ट्रात विधानसभेच्या १९८० च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्षाला २८८ पैकी १८० जागा मिळाल्या, तर काँग्रेस (एस)ला ४७ जागा मिळाल्या. बॅरिस्टर अंतुलेंनी महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाला स्पष्ट बहुमत मिळवून दिल्याने त्यांनी ९ जून १९८० रोजी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. यानंतर १९९५ पर्यंत महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष सत्तेवर राहिला.

महाराष्ट्राच्या राजकारणात १९८० नंतर प्रथमच शिवसेना-भाजपाच्या रूपाने राजकीय स्थित्यंतरास सुरुवात झाली. शिवसेना-भाजपाची युती अस्तित्वात आल्यापासून दोन्ही पक्षांना महाराष्ट्रात फायदाच झाला, असे दिसते. १९९२ च्या अयोध्या प्रकरणात मुंबईतील

बॉम्बस्फोटाने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला, याच गोष्टीचा विधानसभेच्या निवडणुकीत युतीने मराठी अस्मिता मुद्दा समोर करून प्रथमच २८८ पैकी १३८ जागा मिळविल्या. १९८० ते १९९५ पर्यंत असलेली काँग्रेसी मक्तेदारी संपुष्टात आणली. या निवडणुकीत युतीला स्पष्ट बहुमत नसले, तरी अपक्षांना आपल्याकडे वळवून घेतले व महाराष्ट्रात हिंदुत्वाच्या विचाराच्या पक्षाचे आघाडी सरकार महाराष्ट्राच्या राजकारणात अस्तित्वात आले.

१४ मार्च १९९५ रोजी भाजपा-शिवसेना युतीचे मनोहर जोशी यांनी मुख्यमंत्री व गोपीनाथ मुंडे यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. ४० अपक्ष आमदारांच्या सहमतीने युतीचे आघाडी सरकार अस्तित्वात आले. जोशी यांच्या काही निर्णयांमुळे जनतेमध्ये नाराजी पसरण्यास सुरुवात झाली, हे बाळासाहेबांच्या लक्षात येताच त्यांनी ३१ जानेवारी १९९९ रोजी त्यांना राजीनामा देण्यास सांगितले व युतीची धुरा नारायण राणे यांच्याकडे सोपविण्यात आली. १९९९ च्या निवडणुका नारायण राणे व गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली लढविण्याचे ठरविले. या निवडणुकीत युतीला १२५ जागा मिळाल्या; परंतु १९९९ मध्ये युतीला सत्तेबाहेरच राहावे लागले.

२००४ व २००९ च्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतरही युतीला सत्तेबाहेरच राहावे लागले. १९९५ मध्ये जसे या दोन्ही पक्षांमध्ये समन्वयाचे राजकीय वातावरण होते, तसे आज तरी दिसून येत नाही. युतीत मतभेद असले, तरी दोन्ही पक्षांच्या राजकीय फायद्यासाठी व राजकीय विकासासाठी त्यांच्यातली युती टिकून होती. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीला शिवसेना व भाजपा हे पक्ष महाराष्ट्रात प्रमुख स्पर्धक बनले.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि इतर मित्रपक्षांच्या सहकार्याने बहुमताचा दावा करून १८ ऑक्टोबर १९९९ रोजी लोकशाही आघाडीच्या नावाने महाराष्ट्रात काँग्रेसचे सरकार स्थापन झाले. १९९९ ची विधानसभा निवडणूक जवळ आली असताना, शरद पवार व त्यांच्या अनुयायी हे सोनिया गांधींच्या विदेशी जन्माच्या मुद्यावरून राजकारण करून काँग्रेस पक्षातून बाहेर पडले आणि १० जून १९९९ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस नावाचा स्वतंत्र पक्ष स्थापन केला व १९९९ ची निवडणूक स्वतंत्रपणे लढविली; परंतु कोणत्याच पक्षाला बहुमत नसल्यामुळे राष्ट्रवादी व काँग्रेस पक्षात सहमतीचे राजकारण करण्याची भाषा सुरू होऊन दोन्ही पक्ष एकत्र आले व शेतकरी कामगार पक्ष, जनता दल, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) आणि काही अपक्षांच्या सहमतीने लोकशाही आघाडी स्थापन केली. मुख्यमंत्रिपद काँग्रेसकडे जाऊन विलासराव देशमुख यांना देण्यात आले, तर उपमुख्यमंत्रिपदी राष्ट्रवादीचे छगन भुजबळ यांची निवड केली.

महाराष्ट्रात युती जाऊन आघाडी आली आणि पुन्हा आघाडीच्या राजकारणाला सुरुवात झाली. १७ जून २००३ रोजी काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी विलासराव देशमुखांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्यास सांगितले व त्यांनी तो दिला आणि त्यानंतर मुख्यमंत्री म्हणून सुशीलकुमार शिंदे यांची निवड करण्यात आली. आघाडीचे कामकाज चांगले चालू असतानाच राष्ट्रवादीचे उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांचे नाव तेलगीच्या मुद्रांक घोटाळ्यात प्रसिद्ध झाले. त्यामुळे त्यांना राजीनामा द्यावा लागला. विजयसिंह मोहिते-पाटील यांची उपमुख्यमंत्रिपदी निवड करण्यात आली. आघाडीने पाच वर्षांचा कालावधी पूर्ण केला. २००४ ची विधानसभा निवडणूक काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस यांची निवडणूकपूर्व आघाडी मोठ्या प्रयत्नाने झाली. लोकशाही आघाडीने निवडणुका लढविण्याचे जाहीर केले, तर भाजपा-शिवसेना युती कायम राहिली.

२००४ च्या विधानसभा निवडणुकीत लोकशाही आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाले. काँग्रेसने विलासराव देशमुख यांची मुख्यमंत्री म्हणून, तर आर. आर. पाटील यांची उपमुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली. महाराष्ट्रात परत एकदा लोकशाही आघाडीला सुरुवात झाली. २६ ऑक्टोबर २००८ रोजी अतिरेक्यांनी मुंबईवर हल्ला केला. त्याचा परिणाम महाराष्ट्राच्या राजकारणावर झाला. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व केंद्रीय गृह खात्याचे मंत्री म्हणून शिवराज पाटील यांनीही आपल्या पदाचा राजीनामा दिला.

आघाडीला एक वर्ष शिल्लक असताना पुन्हा एका वर्षासाठी अशोक चव्हाण यांची मुख्यमंत्री, तर उपमुख्यमंत्रिपदी छगन भुजबळ यांची निवड केली. अतिरेकी हल्ल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात अभूतपूर्व अस्थैर्य निर्माण झाले. असे असले तरी आघाडी सरकारने पाच वर्षे पूर्ण केली.

विधानसभेच्या २००९ च्या निवडणुका दोन्ही

काँग्रेसने आघाडी करूनच लढविण्याचे ठरविले. दोन्ही पक्षांत अंतर्गत संघर्ष असला, तरी युतीला सत्तेबाहेर ठेवण्यासाठी दोघांमध्ये समझोता होता. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आज तरी महाराष्ट्रात स्वबळावर सत्ता मिळवू शकत नाहीत. सत्तेसाठी आघाडीच्या राजकारणाशिवाय त्यांना पर्याय नाही. त्यासाठी ते एकत्र येतात. २००९ च्या विधानसभेत काँग्रेस आघाडीला १४४ जागा प्राप्त झाल्या, तर युतीला ९१ जागा मिळाल्या आणि युतीला सत्तेपासून दूर राहावे लागले. अशोकराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री, तर छगन भुजबळ यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. २०१० च्या आदर्श गृहनिर्माण सोसायटीतील घोटाळ्याने अशोकराव चव्हाण यांना राजीनामा द्यावा लागला. पृथ्वीराज चव्हाण यांची मुख्यमंत्री, तर अजित पवार यांची उपमुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली.

२०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुका अनेक अर्थाने वेगळ्या ठरल्या. देशाच्या राजकारणात सर्वाधिक काळ २५ वर्षे टिकलेली मैत्री भाजपा-शिवसेना युती निवडणुकीपूर्वीच तुटली. त्यामुळे त्यांनी स्वतंत्र निवडणुका लढविल्या. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातही आघाडीची घडी बसू शकली नाही. त्यामुळे त्यांनीही स्वबळावर निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत मोदी लाट उसळल्याने महाराष्ट्रातही त्याचा फायदा भाजपाला झाला.

२०१९ च्या विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीच्या रूपाने भाजपा व शिवसेना, तर आघाडीच्या रूपाने काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांनी निवडणुकीला समोर जाण्याचा निर्णय घेतला. केंद्रातील लोकसभेच्या निवडणुकीत भाजपाला मिळालेल्या यशाने भारावून जाऊन भाजपा अतिउतावीळपणे या निवडणुकीला उतरला. २०१९ ची निवडणूक संपूर्ण राजकारणाला नवीन कलाटणी देणारी ठरली. निवडणुकीतून कोणत्या प्रकारे का होईना सत्ता भाजपाकडे कशी राहील, याची मोर्चेबांधणी करण्यात आली. अनेक नेत्यांनी भाजपात प्रवेश केला. भाजपा २२० पार करू शकते, हे मतदारांच्या मनात ठसविण्याचा प्रयत्न केला; परंतु प्रत्यक्ष निवडणुकीत भाजपा १०५, शिवसेना ५६, काँग्रेस ४४, राष्ट्रवादी ५४ अपक्ष व इतर १७ असा निकाल आला.

कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्यामुळे सत्तेसाठी मोर्चेबांधणी सुरू झाली. त्यात भाजपा व शिवसेना युती तुटली. परिणामी महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लावण्यात आली. भाजपा व राष्ट्रवादीचे (अजित पवार) यांनी अगदी छुप्या पद्धतीने सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न केला; पण तो यशस्वी झाला नाही. महाराष्ट्राचे सर्वांत कमी कालावधीचे मुख्यमंत्री ठरले. या सर्व घटनांवर शरद पवारांचे लक्ष होते. त्यांनी शिवसेनेला पाठिंबा देण्याचे ठरविले, तसे काँग्रेस श्रेष्ठींसोबत बोलणी झाल्यावर महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष + राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष + शिवसेना या महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आले. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले, तर उपमुख्यमंत्री म्हणून अजित पवार यांची निवड करण्यात आली. या निवडणुकीतून महाराष्ट्राच्या राजकारणाला एक वेगळे नाट्यमय वळण लागले.

**निष्कर्ष –**

राजकीय अस्थिरता, राजकीय सौदेबाजी व त्यातून होणारी पक्षांतरे असे दोष आघाडी सरकारमध्ये दिसून येतात. तरीही आघाडी सरकार ही भारतासारख्या बहुपदरी विविधता असलेल्या राष्ट्राची एक राजकीय गरजही आहे. जगभरात सर्वसाधारणपणे एक भाषिक, एक धार्मिक, एक वांशिक राष्ट्रे असताना भारत हे राष्ट्रच मुळात एक बहुभाषिक, बहुजातीय, बहुधर्मीय अशी आघाडी आहे, 'India itself a coalation' व यामुळे भारतात आघाडी सरकारे स्थापन झाली, याचाच अर्थ भारत आपल्या मूळ रूपात राजकीयदृष्ट्या व्यक्त झाला, असे वाटते.

**संदर्भ**

१ डॉ. फडके य. दि., २००१, पक्षांतराचे राजकारण, अक्षर प्रकाशन, माटुंगा, १९८७.
२. सुहास कूळकर्णी आणि सुहास पळशीकर (संपा.), २००७, महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष-राजकीय पक्षांची वाटचाल.
३. डॉ. भोळे भा. ल., २००३, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर.
४. सिरसिकर वं. म., २००१, आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण (१९६० ते २०००), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
५. डॉ. व्होरा राजेद्र व सुहास पळशीकर, १९९६ महाराष्ट्रातील सत्तांतर, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

◆◆◆